विधान भवन
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक 3623/म.वि.स./ ई-२
दिनांक 17 FEB 2023

**प्रेषक :**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति :**

**विषय :- सन्मा. माजी विधानमंडळ सदस्यांना डिजीटल ओळखपत्र पुरविण्याबाबत..**

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळाच्या माजी विधानसभा व विधानपरिषद सदस्यांना डिजीटल स्वरुपाचे ओळखपत्र उपलब्ध करुन द्यावयाचे आहे.

तरी सदरहू ओळखपत्र पुरविण्यास आपण इच्छुक असल्यास आपले दरपत्रक सर्व करासहित दर नमूद करुन मोहोरबंद लिफाफ्यामधुन **मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई** या पत्त्यावर दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ पूर्वी किंवा त्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठवावे.

आपला,

( राजेश तारवी )
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**सोबत : माजी सदस्यांना पुरवावयाच्या ओळखपत्राबाबतचे निकष.**

..२/-

## डिजीटल ओळखपत्राबाबतचे निकष

---

- ओळखपत्र तयार करण्यासाठी महाराष्ट्र विधानमंडळाच्या माजी सदस्यांच्या वैयक्तिक माहितीचे फॉर्म उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने सदरहू माहिती टंकलिखित करण्याचे (डेटा एकत्रित करण्याचे) काम संबंधित ठेकेदारमार्फत करण्यात येईल.
- ओळखपत्राकरिता कोणत्या वस्तुंचा / साधनांचा वापर करण्यात येणार आहे याचा तपशील दरपत्रकासोबत जोडावा तसेच सोबत जोडलेल्या फॉर्ममधील माहितीप्रमाणे एक नमुना ओळखपत्र तयार करून ते दरपत्रकासोबत सादर करावे.
- ओळखपत्रावरील माजी सदस्यांचे छायाचित्र तसेच अन्य माहिती सुस्पष्ट असावी.